**घन कचरा व्यवस्थापन नियम २०२६, च्या अनुषंगाने ग्रामीण भागात प्रभावी, पारदर्शक व शाश्वत घनकचरा व्यवस्थापन प्रणाली उभारणे व चक्राकार अर्थव्यवस्थेला (Circular Economy) चालना देण्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती (Steering Committee) गठीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४९/पापु-१६
सातवा मजला, गो. ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
दिनांक: ०२.०५.२०२६

**वाचाः-**

१. घन कचरा व्यवस्थापन नियम, २०२६.

**प्रस्तावनाः-**

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी, २०२६ च्या अधिसुचनेद्वारे घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल, २०२६ पासून अंमलात आले आहेत. या नियमांचा मुख्य उद्देश शहरी व ग्रामीण भागातील कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, स्रोताच्या ठिकाणी कचरा वर्गीकरण, पुनर्वापर आणि क्षेपणभूमीवर जाणारा कचरा कमी करणे हा आहे. सदर नियमाद्वारे ग्रामीण भागातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या असून त्यामध्ये राज्यस्तरीय घनकचरा व्यवस्थापन धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी सुनिश्चित करणे, कचरा संकलन वाहतुक प्रक्रिया विल्हेवाट यांचे नियोजन करणे, कचरा कमी करणे व पुनर्वापर (Reduce, Reuse, Recycle, Recovery) या तत्त्वांवर भर देणे, या बाबींचा समावेश आहे. या नियमाद्वारे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांमध्ये चक्राकार अर्थव्यवस्थेला (Circular Economy) चालना देण्यासाठी सुकाणू समिती (Steering Committee) गठीत करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**शासन निर्णयः-**

०१. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६, च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या नियमात निर्देशित केल्यानुसार ग्रामीण भागात प्रभावी, पारदर्शक व शाश्वत घनकचरा व्यवस्थापन प्रणाली उभारणे व चक्राकार अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी खालील प्रमाणे सुकाणू समिती (Steering Committee) गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२. **सदर समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | विभाग, मंत्रालय, मुंबई | |
| ४ | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई | सदस्य |
| ५ | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई | सदस्य |
| ६ | उप सचिव, (स्वच्छ भारत मिशन (ग्रा)), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७ | अभियान संचालक (स्वच्छ भारत मिशन (ग्रा)), राज्य पाणी व स्वच्छता मिशन | सदस्य सचिव |

०३. **समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे आहे**:

१. ग्रामीण भागात प्रभावी, पारदर्शक व शाश्वत घनकचरा व्यवस्थापन प्रणाली उभारणे व चक्राकार अर्थव्यवस्थेला (Circular Economy) चालना देणे.

२. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीने दिलेल्या सूचनांची ग्रामीण भागात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.

३. चक्राकार अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सर्व भागधारकांना सहभागास प्रोत्साहन देणे व मार्गदर्शन करणे.

४. ग्रामीण भागात प्रभावी, पारदर्शक व शाश्वत घनकचरा व्यवस्थापन प्रणाली उभारणे व चक्राकार अर्थव्यवस्थेच्या संबंधात विविध बाबींच्या अनुषंगाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये होत असलेल्या कार्यवाहीचा प्रति तीमाही आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल मा.मुख्य सचिव महोदयांना सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०२१३५९४४५२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(नेत्रा मानकामे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१०. अभियान संचालक (स्वच्छ भारत मिशन (ग्रा)), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापुर.
११. विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व).
१२. जिल्हाधिकारी (सर्व).
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१४. निवडनस्ती (पापु-१६).